P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक – ०४/०८/२०२४

## दि. ०३/०८/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ६९६/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम- १०९, ११५(२), ३५२, ३५१(२)(३), १८९(२), १९१(२)१९१(३),१९० क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३, ७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि०२/०८/२०२४ रोजी १६/१५ वा. चे सुमारास डी. मार्ट चिंचवड चे समोरील आरोपी नामे आयफाज कुरेशी याचे आंडारोल, मोमोज च्या टपरी समारील सर्वजनिक रोडवर |
| गुन्हा दाखल | :- | दि ०३/०८/२०२४ रोजी ०२. ३३ वा. |
| फिर्यादी | :- | आली मुनिर खुरेशी वय-२६ वर्षे व्यवसाय-रिक्षा ड्रायव्हर रा. बिल्डींग नं. १४ रुम नं. ८ निगडी ओटा स्कीम, निगडी पुणे. |
| आरोपी | :- | १) जावेद मुसा कुरेशी २)आयफाज जावेद कुरेशी ३)आवेज जावेद कुरेशी सर्व रा. पिंपरी पुणे.४)आयफाज याचे तीन मित्र. **आरोपी क्रं १ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा भाऊ नामे तन्वीर मुनीर कुरेशी याचे वर गावाकडील ४ गुंठे जमिनीची विक्री करण्यावरुन झालेल्या वादाचा राग मनात धरुन जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने आरोपी क्रं १ याने लोखंडी रॉड ने, आरोपी क्रं २ ते ४ यांनी हातातील कोयत्याने फिर्यादीचा भाउ तन्वीर कुरेशी यांस जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने आरोपी मजकुर यांनी कोयत्याने व आयफाज याचे सोबत इतर दोन मित्रांनी हाताने व लाथा बुक्याने मारहाण केली व सदर परिसरात दहशत निर्माण करुन हातातील कोयते व लोखंडी रॉड हवेत फिरवत निघुन गेले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि पाटील ८३२९४३४६१८ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ९०५/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२),३१८(४), माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (सी),६६ (डी) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ५/०७/२०२४ रोजी दुपारी १/०० वा सुमारास मोबाईल फोनवरुन राहाते घरी बाणेर सुसरोड,पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि०३/०८/२०२४ रोजी १९.४२ वा. |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी वय-३८ वर्षे, धंदा-नोकरी, रा- बाणेर सुसरोड,पुणे |
| आरोपी | :- | (१) मोबाईल नंबर अज्ञात मोबाईल धारक ९८२६०५७३६१<br>(२) ICICR१२०२४०७०५०२८६१३२९ धारक<br>(३) आय.सी.आय.सी. आय बॅक खाते क्रमांक २७१७०५५००१५१ धारक पुर्ण नाव, पत्ते माहीती नाही). |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा मोबाईल नंबरवर अज्ञात मोबाईल धारक ९८२६०५७३६१ याने फोन करुन तो फेडीक्स कुरीअर कंपणी मुंबई अंधेरी येथुन कंपणीचा हेड रिप्रेझेन्टीव्ह बोलत असल्याचे भासवुन तुमचे मुंबई ते इराण असे औषधाचे कुरीअर मध्ये एका औषधामध्ये ड्रग्ज असल्याचे सांगुन ते पार्सल कस्टमवाल्यांनी अटकवुन ठेवले असल्याचे सांगुन त्यासाठी तुंम्हाला मुंबई येथे येवुन ते तुमचे पार्सल नाही हे क्लियर करावे लागेल किंवा ऑनलाईन स्काईप ॲप वरुन बोलुन क्लियर करावे लागेल असे सांगुन फिर्यादी यांना स्काईप ॲप ओपण करण्यास सांगुन त्यामार्फतीने त्यांचे मोबाईलचे स्क्रिनचा ॲक्सेस मिळवुन |

त्यांना बोलण्यात गुंतवुन व आय मोबाईल पे बॅकींग मोबाईल ॲप पाहुन त्यांचे इलिगल बॅक ट्रान्झेक्सनची माहीती पाहुण सांगण्यास लावुन त्यांचे सहमतीशिवाय आय.सी.आय.सी.आय बॅकेत २०,००,०००/- (विस लाख रुपयांचे) प्रि अप्रोल लोन करुन ते फिर्यादी यांचे बॅक खातेवर जमा झाल्यानंतर ते जमा झालेली लोनची रक्कम फिर्यादी यांचे सहतीशिवाय ICICR१२०२४०७०५०२८६१३२९ या मार्फतीने २०,००,०००/-रुपये हे काढुन घेतले आहे. तसेच त्यानंतर लगेचच परत आय.सी.आय.सी.आय बॅक खातेवर ३,५६०००/-रुपये काढुन घेवुन फिर्यादी यांचे एकुण २३,५६,०००/-रुपये (तेविस लाख छप्पन हजार रुपयांचे) आर्थिक फसवणुक केली आहे,म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- मपोउपनि गिरी ८४४६७१४०३५

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी ४७५/२०२४ भा.द.वि. कलम४२०,४६७,४६८

गु.घ.ता.वेळ व ठि. :- ऑगस्ट २०२३ ते दि. ३०/०७/२०२४ अखेर लिफो लॉज भोसरी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि ०३/०८/२०२४ रोजी १९.३९

फिर्यादी :- महीला फिर्यादी वय-६२ वर्षे, धंदा-गृहणी, रा. सदगुरूनगर, भोसरी पुणे मुळ पत्ताः- मु.पो. उरळ, ता. शिरूर जि. पुणे

आरोपी :- सुजाता हरीदास विधाते वय-५० वर्षे, रा. घरकुल सुर्या हौसिंग सोसायटी, सी-६, फ्लॅट नं. ६०६, चिखली पुणे **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी हिने खोटे विवाह नोंदणी प्रमाणपत्र बनवुन त्याआधारे सुजाता प्रशांत सात्रस या नावाने आधारकार्ड, पॅनकार्ड, व पासपोर्ट बनवुन फिर्यादीचा मुलगा प्रशांत सात्रस हिची पत्नी असल्याचे भासवुन फिर्यादीचे मुलाचे नावावर असलेले फॉच्युनर क्र. एम. एच ०८/झेड-०००६, स्वीफ्ट गाडी क्र. एमएच १२ एलडी ९२२९, बुलेट क्र. एमएच १४ एफवाय ३०५० या सर्व गाडया, व प्रशांत याचे सॅमसंग फोल्ड फोर दोन मोबाईल, महागडे स्मार्ट वॉच, इतर वस्तु व कागदपत्रे घेवुन जावुन गाड्यांची विल्हेवाट लावुन फिर्यादी यांची अंदाजे एकुण- २०,००,०००/- रुपयांची अर्थिक फसवणुक केलेली आहे. आरोपी यांनी मी प्रशांत याची पत्नी असुन त्याचे सर्व प्रॉपर्टीवर दावा दाखल करण्याची आम्हांला धमकी दिलेली आहे. तसेच लॉज मालक श्री.नंदकुमार गायकवाड यांना खोटे विवाह प्रमाणपत्र देऊन हॉटेलचे ॲग्रीमेंट तिचे नावाने करुन घेवुन फिर्यादीचे मुलाने दिलेले डिपॉजीट १० लाख रुपये डिपॉझिट हॉटेल मालक नंदकुमार गायकवाड यांनी परत न करता १० लाख रुपयांची अर्थिक फसवणुक केली आहे. अशी एकुण- ३०,००,०००/-रुपयांची फसवणुक केलेली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि जोनापल्ले ७५८८९१०२९७

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ८५१/२०२४, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ३४ व सह महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय आस्थपनां मधील) हितसंबंधांचे रक्षण कायदा कलम १९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- फेब्रुवारी २०२२ पासून ते २९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत वेळ २३/५९ वा.चे दरम्यान हॉटेल ग्रिन व्हेज दत्तमंदीर रोड वाकड पुणे

गुन्हा दाखल :- दि ०३/०८/२०२४ रोजी २०/०७ वा

फिर्यादी :- आयुब मन्वर शेख वय-६६ वर्षे, व्यवसाय- वकिली, रा. साई मंदीराजवळ, विशालनगर, पुणे. ९८८१७३२७६१

आरोपी :- १) विठोबा सखाराम मयेकर रा. गोवा, मोनं.७७५७०२३९९१,९५५२८३१८७९
२) राजीव अशोक केंद्रे रा. एलेजीयम सोसायटी,सी-विंग फ्लॅट नं.७०२, पिंक सिटी रोड, युरो शाळा समोर, वाकड, पुणे. **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना त्यांचा माजी विद्यार्थी नामे किशोर तुरकमारे यांचे सांगण्यावरुन फिर्यादी हे नमुद आरोपी यांना भेटले .तेव्हा आरोपी क्र १ यांनी फिर्यादी यांना विश्वासात घेऊन सांगितले की, आरोपी क्र २ हे स्वतः शेअर बाजारात ट्रेडिंग करतात, त्यांच्याकडे शेअर मार्केटचा खूप मोठा अनुभव आहे आणि लोकांकडून पैसे घेऊन ते शेअर बाजारात गुंतवतात व त्या सर्व लोकांना ते प्रति महिना ५ टक्के त्याचा मोबदला म्हणून परतावा देतात. फिर्यादी यांनी त्यावेळी आरोपी क्र २ यांच्या एकदंत ट्रेडर्समध्ये गुंतवणुक केल्यावर रुपये

५० हजाराला १० महिन्यांचे कालावधीत ७५ हजार रुपये परतावा तसेच १ लाख रुपयांसाठी १.५० लाख रुपये परतावा याप्रमाणे गुंतवणुकदारांना माहिती जाहिरात करुन व फिर्यादी यांना तुम्ही आमच्या कंपनीमध्ये पैसे गुंतवणुक करा मी तुम्हाला त्याचा परतावा म्हणून प्रत्येक महिन्याला ५ टक्के रक्कम देईन असे सांगितल्याने तेव्हा फिर्यादी यांनी त्यांच्या दोघांच्या सांगण्यावर आणि बोलण्यावर विश्वास ठेवून तरी फेब्रुवारी २०२२ पासून ते नोव्हेंबर २०२२ पर्यंत नमुद आरोपी यांनी एकदंत टेडर्स, ORBINOX, MARVEL FX UNITED KINGDOM या कंपन्यांमध्ये फिर्यादी यांचे ५० ते ६० मित्र नातेवाईक, सहकारी यांना गुंतवणुक करण्यास भाग पाडून ११ महिने गुंतवणुकीच्या रकमेवर परतावा परत देऊन गुंतवणुकीची मूळ रक्कम आम्हाला परत दिली नाही. नमुद आरोपी यांचे कंपन्यांमध्ये फिर्यादी व फिर्यादीचे मुलांनी मिळून केलेल्या रुपये ५७,५७,५००/- एवढया रक्कमेची गुंतवणुक परतफेड न करता फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि नाळे ९०११११८१९९९

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी ३१६/२०२४ भा.द.वि.कलम ४२०,४०६,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- मार्च २००९ रोजी ते दि ३०/०६/२०२४ रोजीचे दरम्यान सावित्री कन्स्ट्रक्शनचे स.न. ८७/०२ काशीद पार्क पिंपळे गुरव पुणे

गुन्हा दाखल :- दि ०३/०८/२०२४ रोजी २२/१५ वा

फिर्यादी :- श्री किशोर शंकर गारवे वय ६७ वर्षे धंदा- व्यवसाय रा नवी सांगवी पुणे

आरोपी :- १) सज्जन पंडीतराव देशमुख
२) श्याम सज्जन देशमुख दोघे रा.सर्वे नंबर १५/१, प्रभुकृपा बिल्डींग वारजे नाका, युनिव्हर्स इमारती समोर, एन.डी.ए रोड पुणे **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी फिर्यादी यांना त्यांच्या युनिव्हर्सल कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड रिसर्च या कॉलेजच्या इमारतीचे बांधकाम करण्याचे कॉन्ट्रक्ट दिले. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी त्यांच्या कॉलेजच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण केले, त्यांना त्याचा ताबा दिला. परंतू त्या बदल्यात बांधकामाची ठरलेली रक्कम व त्यांच्या आर्थिक अडचणीच्या वेळी त्यांना दिलेली रक्कम अशी एकुण ५,१०,००,०००/- रु. (पाच कोटी १० लाख रुपये) एवढी रक्कम फिर्यादी यांना दिली नाही, उलट रिझर्व्ह बॅक ऑफ इंडीया च्या दिनांक ३०/०९/२०२० च्या परिपत्रकानुसार युनियन बॅक ऑफ इंडिया मध्ये विलीन झालेल्या कॉर्पोरेशन बँकेचे न वटणारे व त्यावर चुकीच्या पध्दतीने रक्कम नमूद केलेले दोन चेक्स त्यांनी फिर्यादी यांना देऊन फसवणुक केली. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- वपोनि बनसोडे ९८७०१६८६४७

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ५०५/२०२४ भादंवि कलम ३२६, ३२३, ५०४,५०६,३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २८/०६/२०२४ रोजी सायंकाळी ०४/०० ते ०५/०० वा चे दरम्यान व
दि. २९/०६/२०२४ चे ०९:३० वाजता मुंगी कंपनी, निघोजे येथे ता. खेड जि. पुणे

गुन्हा दाखल :- दि ०३/०८/२०२४ रोजी २३.०५ वा

फिर्यादी :- महेश तानाजी पवार वय ३४ वर्षे रा. दवणेवस्ती आबेठाणता.खेड जि पुणे मुळ रा. मु पो बेलवाडीता.इंदापूर जि पुणे

आरोपी :- १) अमित बारजीबे २) अजय बागडे ३) दिपक खोत
४)शामकुमार (एच आर) सर्व मुंगी इंजिनिअरींग प्रा.ली. कंपनी, निघोजे ता. खेड जि. पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे कामावर असताना दिनांक २८/०६/२०२४ रोजी सायंकाळी ०४:०० ते ०५:०० वाजताचे दरम्यान आरोपी क्र १ याने शिवीगाळ करुन लोखंडी पेपर होल करायचा पंच ने उजव्या हातावरील बोटांवर मारुन धमकी दीली तसेच दि. २९/०६/२०२४ चे ०९:३० वाजता एच आर ला अमीत बारजीभे ची तक्रार करण्याकरीता फिर्यादी गेले असता कंपनीतील आरोपी क्र २ याने धमकी देउन हाताने मारहाण केली व आरोपी क्र ३ व ४ यांनी धमकी दिली. दि. २९/०६/२०२४ रोजी फिर्यादी सदर कंपनीतील ईसमांची तक्रार पोलीस स्टेशन महाळुंगे एमआयडीसी येथे दिली त्यावेळेस फिर्यादी यांची अदखलपात्र तक्रार नोंदवून घेतली होती. काही दिवसांनतर फिर्यादीच्या उजव्या हाताचे बोटदुखु लागल्याने त्यांनी खाजगी दवाखान्यात

उपचार घेतले असता, त्यांचे उजव्या हाताचे बोट फ्रॅक्चर झाल्याचे समजले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा जायभाये ८२०८९९०५६०

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- देहुरोड ३६७/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम २८१,१२५, (अ)(ब)३२४ (४) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०२/०८/२०२४ रोजी १०/२० वा. सुमारास तळवडे चौकाच्या पुढे ॲटोसिस कंपनीच्या समोर निगडीकडे जाणा-या रोडवर तळवडे ता. हवेली जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि ०३/०८/२०२४ रोजी १९/४९ वा

फिर्यादी :- ज्ञानेश्वर व्यंकटी पवार, वय ३४ वर्ष, धंदा नोकरी, रा. अमोल अपारमेंट बिल्डींग नं. १/७, स्किम नं २, सेक्टर नं २१,यमुनानगर निगडी पुणे

आरोपी :- गाडी नं एम एच १४ के ए ७२६२ वरील चालक

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांच्या साडूचा मुलगा नामे केतन केशव पवार वय २३ वर्ष रा. यमुनानगर निगडी पुणे हा महेंद्रा कंपनी चाकन येथून त्याचा मिञ आलोक रंजन हे दोघे त्याची मोटारसायकल क्र एम एच १४ एफ एफ ५१७९ ने महेंद्र कंपनी येथे मुलाखत देउन त्याचे राहते घरी निगडी येथे येत असतांना तळवडे चौकाच्या पुढे ॲटोसिस कंपनीच्या समोर निगडीकडे जाणा-या रोडवर तळवडे ता. हवेली जि.पुणे येथून जात असतांना अचानक पांढ-या रंगाचा टेंम्पो क्र एम एच १४ के ए ७२६२ वरील चालकाने वाहतुकिचे नियमांकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात,हयगयीने अविचाराने रस्त्याचे परीस्थितीकडे न पाहता टेंम्पो चालकाने यु टर्न घेउन समोरून येणा-या मोटारसायकल वरिल केतन पवार यास गंभीर दुखापत होण्यास कारणीभूत झाला व पाठीमागे बसलेल्या त्याचा मित्र आलोक रंजन यास किरकोळ दुखापतीस कारणीभूत होवून त्यास उपचार कामी दवाखाण्यात न नेता तसाच तेथून पळून गेला आहे व मोटारसायकलचे नुकसान केले आहे. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा प्रकास ९८६०२५११७८

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी ४७६/२०२४, भारतीय न्याय संहिता कायदा २०२३ चे कलम ९४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०३/०८/२०२४ रोजी १३/०९ वा. चे सुमा. त्रिलोक्य बुद्ध विहारचे समोर, दापोडी-बोपोडी रोडचे कडेला, बंटी गृपचे ऑफीसचे गेट जवळ, दापोडी पुणे

गुन्हा दाखल :- दि ०३/०८/२०२४ रोजी २३/ १३वा

फिर्यादी :- सचिन नामदेव पारधी वय ३६ वर्षे, पोलीस हवालदार ब.नं. १२६७, नेमणुक भोसरी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड शहर

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी अज्ञात आरोपी इसमाने एक पुरूष जातीचे अर्भक वय अंदाजे १ ते २ दिवस यास त्याचा जन्म जाणून बुजून लपवून ठेवण्याकरीता त्याचे शरीरीची विल्हेवाट लावण्याकरीता रस्त्यावर फेकूण दिले आहे म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि शेख ९६१९१९३११२

१०.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ५०४/२०२४ माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (ड)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २२/११/२०२३ व दि ०१/१२/२०२३ रा. खालुंब्रे ता खेड जि पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि ०३/०८/२०२४ रोजी २०/१९ वा.

फिर्यादी :- पुरुष फिर्यादी वय ५३ वर्षे, धंदा ख. नोकरी, रा. एमआयडीसी शाहुनगर चिंचवड पुणे

आरोपी :- khayrul.alam@bgc-bdh.com वरुन मेल करणारा अज्ञात इसम

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी अज्ञात इसमाने कंपनीचे मेलआयडी umesh.rajput@kohinoortissue.com यावर khayrul.alam@bgc-bdh.com हा बशुधरा पेपर मील लिमीटेड कंपनी पत्ताः मे. बशुंधरा सिटी १३/ केए/ १/ पंथापथ ढाका– १२१५ बांगलादेश या

कंपनीचा साम्य असलेला फिशींग (बनावट) मेल आयडी तयार करुन कोहीनुर टिशू कन्व्हर्टींग कंपनी, खालुंब्रे ता खेड जि पुणे या फिर्यादीने कंपनीसाठी बशुंधरा पेपर मील लिमीटेड कंपनी पत्ताः मे. बशुंधरा सिटी १३/ केए/ १/ पंथापथ ढाका– १२१५ बांगलादेश या कंपनीकडुन मागवलेल्या मालाची खोटी बिले तयार करुन ते आम्हास फिर्यादीचे कंपनीचे मेल आयडीवर पाठवुन FIRST ABUDHABI BANK, SAHARA CENTRE BR.SHARJAH IBAN NO AE860351821005927766001 SWIFT CODE – NBADAEAA या चुकीच्या बँक खात्यावर कंपनीची २८,७८,४१४.७१/- रुपये रक्कम टेलीग्राफिक ट्रान्सपर मार्फत अकाऊंटला घेवुन स्वतःच्या आर्थिक फायदयाकरिता फिशिंग (बनावट) मेलव्दारे फसवणुक केलेली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- वपोनि गिते ९८७०२०९०६२

११.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी ४७७ /२०२४ भारतीय न्याय संहिता कायदा २०२३ चेकलम ३३३, १०९, ७४,११५(२),३५२,३२४(४), भारतीय हत्यार कायदाकलम ४(२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)सह १३५, क्रिमिनल लॉ अमेंडमेंट कायदा कलम ३,७ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०३/०८/२०२४ रोजी रात्रौ ०८/०० वा. चे सुमा. फिर्यादी यांचे राहते घर चक्रपाणी वसाहत, हनुमान कॉलणी क्र.७, भोसरी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि ०४/०८/२०२४ रोजी००.१५वा

फिर्यादी :- कुमार रोहित समाधान गांडूळे वय २२ वर्षे, धंदा व्यवसाय, रा. चक्रपाणी वसाहत, हनुमान कॉलणी क्र.७, भोसरी पुणे

आरोपी :- कुंदनसिंग लाखनसिंग टाक वय २० वर्षे, रा. हनुमान कॉलणी क्र.५ चक्रपाणी वसाहत भोसरी पुणे.
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी मजकुर याने यातील फिर्यादी यांचेसोबत काही वेळा पुर्वी झालेल्या भांडणाचा राग मनामध्ये धरून हातामध्ये कोयता घेवून फिर्यादी यांचे घरात घुसुन मोठ मोठयाने आरडा ओरडा करत शिवीगाळ करत घराच्या खिडक्या व गृहोपयोगी वस्तुंचे नुकसान करून फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने त्याचे डोक्यात कोयता मारला असता ते पाहून फिर्यादी यांचे वडीलांनी फिर्यादी यांना बाजूला ओढल्याने सदरचा कोयता फिर्यादी यांचे पायास घासल्याने फिर्यादी त्यात जखमी झाले. सदरचा प्रकार पाहून फिर्यादीची आईने मध्यस्थी केली असता तिस अश्लील भाषेत शिवीगाळ करुन तिचा गाऊन फाडून ती चे स्त्री मानास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले त्यावेळी फिर्यादीचे आई वडील हे मदती करीता लोकांना विनंती करत असतांना त्याच्या हातातील कोयत्याने त्यांचे राहते घराचे परिसरातील लोकांना धमकावुन दहशत निर्माण करुन त्यांना धाकाने परावृत्त केले व तेथून निघुन गेला आहे म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि केंद्रे ७९७२०८५५५०

१२.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी ९०७/२०२४ भारतीय न्याय संहिता कायदा ११०,१२५ आर्म ऑक्ट कलम ३० प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०३/०८/२०२४ रोजी पहाटे ०१.०० वा. सुमारास आमचे हॉटेल इमेज फॅमिली रेस्टॉरंट म्हाळुंगे पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि ०४/०७/२०२४ रोजी ००.३७ वा.

फिर्यादी :- दत्ता तानाजी अर्जुन वय-२८ वर्षे धंदा-नोकरी रा. फ्लॅट नं.२०१ पडाळे निवास, साई क्लिनिक म्हाळुंगे ता.मुळशी जि.पुणे मुळगाव- पिंगळे बुद्रुक, अर्जुन वस्ती, ता. माण, जि. सातारा

आरोपी :- बाळासाहेब व्यकटराव दराडे, वय - ४१ वर्षे धंदा- व्यवसायस रा. यशवीन सोसायटी फ्लॅट नं. १२०५ विग एफ विबंगीअर रोड सुसगाव ता.मुळशी जि. पुणे. **आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे हॉटेल इमेज फॅमिली रेस्टॉरंट म्हाळुंगे पुणे येथे फिर्यादी यांचे तोंड ओळखीचे कस्टमर नमुद आरोपी यांनी त्यांच्या कडील गन काढुन हॉटेलच्या पहिल्या मजल्यावरील फॅमिली ए.सी. रूममध्ये पुर्वेकडील भिंतीवर फायर केल्यामुळे स्वतःच्या व हॉटेलमधील ईतर ग्राहक व हॉटेल स्टाफ यांच्या जिव जावु शकतो व त्याच्या जिवीतास धोका निर्माण होईल याची जाणिव असताना ही गन मधुन फायर केला आहे. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि शेळके ९३७१४१९९९९